Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9| September 2025

Original Article

# कवी केतन पिंपळापुरे :आंबेडकरी चळवळीतील एक उत्तुंग व्यक्तिमत्व एक शोध निंबंध

गोपाल श्रीकृष्णाजी मून[1], डॉ. प्रवीण बळीरामजी काळे[2]
[1]संशोधक, मराठी विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर
[2]मार्गदर्शक, मराठी विभाग कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आर्वी
**Email-** gopalmoon2018@gmail.com

**Manuscript ID:**
JRD -2025-170937
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 9
Pp. 202-206
September 2025
**Submitted:** 21 Aug. 2025
**Revised:** 1 Sept. 2025
**Accepted:** 20 Sept. 2025
**Published:** 30 Sept. 2025

***सारांश***

*कवि के साहित्य में लोकजीवन, संस्कृति, धर्म और समाज के विविध पहलुओं का समावेश दिखाई देता है। उनके काव्य में डॉ. बाबासाहेब आंबेडकर की विचारधारा, बौद्ध दर्शन तथा समानता, करुणा और नैतिकता के मूल्यों का प्रभाव स्पष्ट रूप से झलकता है। फियागी की कविताएँ सामाजिक चेतना जगाने के साथ-साथ अन्याय और विषमता के विरुद्ध आवाज़ उठाती हैं। अध्ययन से यह निष्कर्ष प्राप्त हुआ है कि डॉ. फियागी का रचना-संसार मानवीय मूल्यों पर आधारित है, जिसमें व्यक्ति और समाज दोनों की प्रगतिशील चेतना पर बल दिया गया है। उनका काव्य आधुनिक मराठी दलित साहित्य की सशक्त परंपरा को आगे बढ़ाने वाला है।*

***मुख्यशब्द :-*** *डॉ. सुरु फियागीकर,मराठी काव्य,दलित साहित्य,सामाजिक वास्तव,मेघदूत कविता संग्रह,मुक्तीची प्रेरणा, सामाजिक चळवळी, धार्मिक संदर्भ,लोकशाही मूल्ये,साहित्यिक योगदान,स्त्रीवादी दृष्टिकोन,सांस्कृतिक जागरूकता,मानवी मूल्ये सामाजिक परिवर्तन*

## प्रस्तावना

कवी केतन पिंपळापुरे आंबेडकरवादी चळवळीत, आंबेडकरवादी साहित्य चळवळीत आणि समता सैनिक दलात सक्रिय होते. त्यामुळे आंबेडकरवादी समाजाचे जीवन त्यांना अतिशय जवळून बघता आले. भगवान बुध्द, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तत्वज्ञानानुसार त्यांनी समाजव्यवस्थेचे अवलोकन, मूल्यमापन केले. आपल्या कवितांना प्रगतशिल विचारांचे वळण दिले. लोकशाहीच्या प्रागतिक भूमिकेचे त्यांच्या कवितेत समर्थन आहे, तर प्रतिगामी विचार व कृतींचा निषेध आहे. आंबेडकरवादी कविता माणसाच्या विरोधात नाही. ती माणसातल्या पशुत्वाच्या विरोधात आहे. आंबेडकरवादी कविता कोणत्याही धर्माच्या विरोधात नाही, ती माणसातला मानवधर्म नष्ट करणा—या धार्मिक चालीरीतींच्या विरोधात आहे.

आंबेडकरवादी कविता धर्मांधतेवर रोष व्यक्त करते धर्मांधता ही लोकशाहीला मारक आहे. मानवाच्या विकासाला बाधक आहे म्हणून आंबेडकरी कविता धर्मांधतेवर आपला रोष व्यक्त करते हा रोष कोणाचेस वाईट चिंतीत नाही. एकुणच भारतीय समाजाची योग्य दिशेने वाटचाल व्हावी हा यामागचा व्यापक दृष्टीकोन असतो. अगोदरच समाज दु:खजर्जर आहे, शोषणाने जर्जर आहे. चुकीच्या कृतीतून पुन्हा दु:खात, शोषणात वाढ होऊ नये, हा यामागचा उद्देश आहे. आंबेडकरवादी साहित्यात, कवितेत समाजातील सर्व प्रकारच्यावाईटांवर दु:ख शोषणावर बोलण्याचा अधिकार आहे. ही अधिकारीक जाणीवच आंबेडकरवादी साहित्य निर्मितीच्या मुळाशी आहे. आंबेडकरवादी लेखक, कवींची प्रेरणा आहे. टीका, रोष, विद्रोह ही आंबेडकरवादी साहित्याची वैचारिक साधने कवी केतन पिंपळापुरे यांच्या कवितेला हे साध्य माहित आहे. म्हणून त्यांची कविता इकडे—तिकडे भटकत नाही. प्रस्तुत शोध निबंधात कवी केतन पिंपळापुरे यांचे आंबेडकरी चळवळीतील भुमिका व योगदान याबाबतचा सखोल आढावा घेणार आहोत.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*गोपाल श्रीकृश्णाजी मून, संशोधक, मराठी विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर*

**How to cite this article:**
*मून, . गोपाल . श्रीकृष्णाजी ., & काळे, . प्रवीण . बळीरामजी . (2025). कवी केतन पिंपळापुरे:आंबेडकरी चळवळीतील एक उत्तुंग व्यक्तिमत्व एक शोध निंबंध. Journal of Research and Development, 17(9), 202–206.*
*https://doi.org/10.5281/zenodo.17472050*

Quick Response Code:
Website:
https://jrdrvb.org/
DOI:
10.5281/zenodo.17472050

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9| September 2025

**1) केतन पिंपळापुरे यांचे जीवन व साहित्य :–**

**अ) लौकिक चारित्र :–**

मार्षल केतन पिंपळापुरे यांचा जन्म 05 ऑक्टोंबर 1965 ला पिंपळापुर, ता. राळेगांव, जि. यवतमाळ येथे झाला. भूमिहिनांच्या सत्याग्रहात समस्त पिंपळापूरकर रहिवाषी सामील झाले होते. नामांतराचा मोर्चा, बौध्दांच्या सवलतीचा मोर्चा या षिवाय अनेक मोर्चात गावातील माणसाचा सक्रीय सहभाग असायचा अषा चळवळीच्या गावात डॉ. बाबासाहेब आंबेडकर व भगवान बुध्द जयंतीला रात्रीच्या वेळेस हातात मेणबत्या घेऊन गावभर मिरवणूक निघायची अषावेळी न कळत केतन पिंपळापुरे यांचे नात समाजिक चळवळीषी जुळत गेले.

**प्रकाषित साहित्य**

सुर्यकंकण 1995, मार्षल रेस 2002, डेमोफून 2006, मकाबी 2012, हेमलॉक 2013, नोवल द्रूथ 2015

**गितसंग्रह :–**

गर्जा जयजयकार भीमाचा (प्रतिनिधिक), ध्वनीफित, हे स्मरण युगंधराचे, कॉरवा निळया पाखरांचा, ऋण भिमाचे, रम्य पहाट झाली.

**चित्रकारिता :–**

हिमाचल प्रदेष (धर्मषाळा), छत्तीसगड (रायपूर कवलनार), महाराश्ट्रात नागपूर, यवतमाळ, अमरावती, चंद्रपूर, गडचिरोली, औरंगाबाद येथे काव्यचित्र प्रदर्षन

**विषेश सन्मान :–**

सदस्य केंद्रीय कार्यकारी समिती, समता सैनिक दल, सदस्य समता संगर, सामाजिक संस्था, नागपूर 'दि पिपल' या चळवळीच्या वृत्तपत्राचे 20 वर्शापासून कार्यकारी संपादक, महाराश्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघा तर्फे ऑक्टोंबर 2006 ला विषेश सत्कार, 1 जानेवारी 2006 ला गरूड ऑटोरिक्षा युनियन (विदर्भ प्रदेष) नागपूर तर्फे विषेश सत्कार, दि. 29 नोव्हेंबर 2008 ला पहिले आंबेडकर विद्यार्थी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद भूशविले, आदिम साहित्य समिती नागपूर तर्फे जानेवारी 2011 ला विषेश सत्कार, आनंद बुध्दविहार समिती सीताबर्डी नागपूर व्दारा आनंद गौरव पुरस्कार 2015, सांजप्रभा गझल साहित्य प्रतिश्ठान, चंद्रपुर तर्फे विषेश सत्कार, 4 एप्रिल 2015, तर 14 एप्रिल 2015 ला डॉ. आंबेडकर जयंती उत्सव समिती, घोघली (पिपळा) तर्फे विषेश सत्कार करण्यात आला.

'सूर्यकंकण' या साहित्यकृतीला आंबेडकरी साहित्य संसद, बल्लारपूर व्दारा (घोशित) 'अन्नाभाऊ साठे उत्कृश्ठ वाङ्‌मय पुरस्कार 2000, तर 'मार्षल रेस' या वाङ्‌मय कृतीला 'आंबेडकरी साहित्य अकादमी', यवतमाळ व्दारा षब्दाला काव्य पुरस्कार 2000 प्राप्त झाला.

**2) केतन पिंपळापुरे यांची आंबेडकरी चळवळीतील सक्रिय सहभाग**

विद्यार्थी दषेपासूनच सामाजिक सांस्कृतीक व साहित्यिक कार्यात कृतिषील सहभाग, आंबेडकरी साहित्य संमेलने, आंबेडकरी युवा परिशदा आणि जनजागृती अभियानात सहभाग नामांतर आंदोलन, मुंबई नागपुर 1993–94 रिपब्लिकन सॉलिडरीटी नागपूर 1995, मुक्तीसंगर, जनजागृती सायकल अभियान (विदर्भ , मध्यप्रदेष) 1997, आंबेडकरी महिला परिशद, भद्रावती 1998, आंबेडकरी युवा परिशद, नागपूर 1999, आंबेडकरी षतक स्वागत परिशद औरंगाबाद 1999–2000, आंबेडकरी विद्यार्थी युवक मेळावा बल्लारपूर 2000, आंबेडकरी विद्यार्थी युवक मेळावा, हिंगणघाट 2000, संविधान जागृती अभियान लॉगमार्च (1500 कि.मी.) (12 मार्च ते 7 मे 2001, चैत्यभूमी दादर ते दीक्षाभूमी नागपूर आंबेडकरी इतिहास परिशद, अमरावती 2001 आंबेडकरी षिक्षक परिशद, यवतमाळ 2002 मुक्ती कोण पथे, अभियान महाराश्ट्र मध्यप्रदेष 2002, धम्मक्रांती महा अभियान (धम्मक्रांती सुवर्ण जयंती महोत्सव) नागपूर 2006, आंबेडकरी स्वाभिमान परिशद घाटंजी 2007, आंबेडकरी चेतना परिशद, पांढरकवडा 2008, आंबेडकरी संघर्श परिशद, नागपूर 2007, धम्मक्रांती परिशद, वणी 2008, रिपब्लिकन सॉलिडरीटी वणी, 2007 रिपब्लिकन जनचेतना परिशद, यवतमाळ 2012 रिपब्लिकन मॅनिफेस्टो कान्फरन्स नागपूर 2012, आंबेडकरी युवा परिशद, भोपाल (म.प्र.) 2012 आंबेडकरी युवा परिशद, पांढुर्णा (म.प्र.) 2013, आंबेडकरी युवा परिशद, सावनेर (म.प्र.) 2014, रिपब्लिकन मॅनिफेस्टो कान्फरन्स भोपाळ 2014, भीमहीन संघर्श परिशद, अदिलाबाद (तेलंगणा) 2015

आयुश्याचा प्रवास सुरू झाला तेव्हापासूनच सामाजिकतेची जाण निर्माण होऊ लागली, षाळा, कॉलेजात वाचनासह चर्चा, वादविवाद, स्पर्धेच्या धामधुमीत आंबेडकरी साहित्याची ओळख होऊ लागली. बी.एस्सी. प्रथम वर्शाला असतांना बाबुराव बागुलांचे 'दलित साहित्य', आजचे क्रांतीविज्ञान व डॉ. यषवंत मनोहरांच 'उत्थानगुंफा' नावाच अग्नीवादळ वाचनात आल्याने बालपणीच मनात रूजलेल्या चळवळीच्या रोपटयाला ज्वालांच्या फांदया फुटायला सुरूवात झाली.

चळवळीच्या समर्पित असणा–या माणसांच्या सहवासामुळे आयुश्याचे सगळे संदर्भच बदलून गेले. आयुश्याच्या प्रवासात समता सैनिक दल, सदस्य समता संगर सामाजिक संस्था, नागपूर 'दी पिपल' या चळवळीच्या वृत्तपत्रात 20 वर्शापासून कार्यकारी संपादक म्हणून भूमिका स्वीकारून जबाबदारीने कर्तव्य पुर्णत्वास नेले.

कॉलेज जीवनात बाबुराव बागूल, नामदेव ढसाळ, यषवंत मनोहर, प्रकाष जाधव, नारायण सूर्वे, उमरखवास, दुश्यंतकुमार – लक्ष्मीकांत घुमे प्रसेनजित गायकवाड, आदी कवींच्या भन्नाट कवितेने कवीला मोहित केले आणि तिथूनच त्यांच्या कवितेच्या दिषेने आषावादी प्रवास सुरू झाला.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9| September 2025

**3) केतन पिंपळापुरे यांच्या सामाजिक भान असलेल्या कविता :—**

कवी केतन पिंपळापुरे यांच्या कविता संग्रहाचे 'डेमोफून' हे षीर्शक मराठी भाशिकांना अपरिचित आहे. 'डेमोफूनची कथा पुढीलप्रमाणे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पंचावन्नाव्या वाढदिवसानिमित्त काही पत्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना भेटायला येतात. त्यावेळी त्यांच्या आग्रहावरून या देषातल्या षोशितांना संदेष देतांना ग्रीक कवी होमरच्या महाकाव्यातली कथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांगायला सुरूवात करतात त्यात डिमेटर नावाची देवता या विष्वाच्या उध्दाराकरिता आपण एक महापुरूश घडविला पाहिजे, या भावनेने झपाटलेली असते ती आपला वेश बदलून त्या महापुरूशांचा षोध घेत ती फिलॉस राजाच्या राज्यात येते. राजा तिला आपल्या मिटोनेरिया राणीची दासी म्हणून सेवेला ठेवतो. राणी आपल्या तान्हया बाळाच्या संगोपनाची जबाबादारी तिला सोपविते. दिवसभर ती त्या बाळाचे संगोपन करते आणि रात्री त्याच्या अंगावरचे सर्व कपडे काढून त्याला धगधगत्या निखा—यावर ठेवते उद्देष हा की, त्या बाळाच्या अंगात आगीची धग सोसण्याची क्षमता यावी हा क्रम नित्यनेमाने सुरू असतो. हळूहळू त्या बाळातही आगीची धग सोसण्याची क्षमता वाढीस लागते. एकदा सहज रात्रीच्या वेळी राणी या दासीच्या कक्षात डोकावून बघते तर आपले बाळ धगधगत्या निखा—यावर ठेवलेले दिसते. तिचे मातृहदय कळवळून उठते. ती धावत जाऊन बाळाला निखा—यावरून उचलून जवळ घेते आणि ही कथा इथवर सांगून डॉ. बाबासाहेब आंबेडकर थांबतात, परंतु हे जग मात्र एका महापुरूशाला मुकलं ! त्या मुलाचे नांव असते 'डेमोफून' तात्पर्य महापुरूश आकाषातून पडत नसले तरी धग सोसल्याषिवाय ते घडत नाही. कवी केतन पिंपळापुरे यांनी आपल्या जीवनात प्रत्यक्ष दुःख षोशणाची धग सोसली षोशित, पीडित समाजाचे दुःख, षोशण पाहून त्यांचे कविमन गहिवरले आणि त्यांच्या षब्दांनी कवितारूप धारण केले. त्या कवितांचा संग्रह म्हणजे 'डेमोफून' होय.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या एका ग्रंथाचे नांव 'मुक्ती कोण पथे ? असे आहे कवी केतन पिंपळापुरे यांच्या 'डेमोफून' या कवितासंग्रहातील पहिल्या कवितेचे षीर्शक 'मुक्ती कोण पथे ? असे आहे षीर्शकावरून कवितेतील आषयाचा आपल्याला अंदाज येतो. कवी केतन पिंपळापुरे यांना तत्वज्ञानाचा गुंतावळा जटील वाटतो. तसा तो असतोही कवी केतन पिंपळापुरे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या उदयापूर्वी समाजात वर्ण, धर्मवेद, जाती आधारित जी विदारक परिस्थिती होती त्याचे वर्णन मुक्ती कोण पथे ? या कवितेच्या प्रारंभी केले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा मुक्तिपथ आपण विवेकाच्या सहाणेवर (कुरूंदाचा दगड /खरप) घासून, तपासूनच स्वीकारला आहे. आपण या मुक्तिपथावरून चालत असल्याचे कवी कवितेतील पुढील ओळीत नमूद करतो आणि म्हणतो....देहातील रक्तवाहिण्यासारखी जटील
तत्वज्ञानाची अफलातून गुंतावळ
जन्मप्राण्याच्या आत्मरत जाळयात
गुंतला असतो प्राण
वर्ण वेदाच्या डोळयात उभे असतात
अटळ रक्तषुचितेचे तीक्ष्ण षुळ
या चतुस्पाद ग्रंथ पंथाच्या तार्किक गदारोळात
उढत असते सदासर्वकाळ — सदा — सर्वकाळ
(डेमोफून पृश्ठ क्र. 1 व 2)

केतन पिंपळापुरे आषावादी कवी होते आषावादी असणे हे माणसाच्या जिवंतपणाचे लक्षण आहे. कवी नव्या युगाची आषा आपल्या कवितेत बाळगून आहे. या नव्या युगात माणसाला मनमोकळे जीवन जगता येईल. जीवनाच्या सर्व वाटांवरून माणसाचा चालता येईल, अषी आषा कवी कवितेत पल्लवित करतो.

अस्पृष्यांना त्यांचे हक्क मिळावेत म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतःला वादळात झोकून दिले. अस्पृष्यांच्या उत्थानाकरीता ते अहोरात्र झटले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर पवित्र, षुध्द जीवन जगले असे पवित्र षुध्द जीवन सा—यांना लाभत नसते असे कवी कवितेतील पुढील ओळीत नमूद करतो आणि म्हणतो.....

(''बिल्डिंगच्या गच्चीवर उभे राहून
पतंगासारखी स्वप्ने उडवावी आकाषात
असे मुग्ध आयुश्य सा—यांनाच लाभत नसते
मुठभर चांदणे अंगणभर उधळून सुखांनी सावे
मनमुराद असे धुंद आयुश्य सा—यांनाच लाभत नसते.
दिवस वितळून जातो तेव्हा मुक्त होतात
जिंदगीच्या खर्डेघाषीतले ष्वास गाडीच्या धुरांनी,
हॉर्नच्या सुरांनी गजबजून जावी एखादी कारकुनी सायंकाळ
तषी प्रष्नांनी गजबजलेली असते कुणाची रूटीन जिंदगी''
(डेमोफून पृश्ठ 5 व 6)

कवी केतन पिंपळापुरे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना दिव्य पुरूश मानतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या डोळयात पाहिले की, आपल्याला दिव्यत्वाचा भास होतो. असे कवी सांगतो, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांवर कवी नतमस्तक होतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चेह—यात कवीला षीलाचे तेज दिसते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी रोखलेले बोट कवीला संगिनीच्यापात्यासारखे चक्राकृतांना दिसते.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9| September 2025

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तेजस्वी प्रतिमेत आपल्याला आदिविद्रोही स्पार्टकसचा पुतळा दिसतो असे कवी सांगतो. एका हाताने स्पार्टकस निरागस बाळाला कुरवाळत आहे तर दुस–या हातात उगारलेले तळपती तलवार आहे असे कवी कवितेत नमुद करतो कवी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना दिव्य पुरूश वाटतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या डोळयात पाहिले की आपल्याला दिव्यत्वाचा भास होतो असे प्रतिपादन कवी 'दी मोस्ट रिमार्केक्ल कोलंबियन' या कवितेतील पुढील ओळीत करतो आणि म्हणतो......

मी तुमच्या व्यक्तितत्वाचा खुदा अथवा
प्रेशित संबोधित नाही तरीही ......
तुमच्या डोळयातल्या तेजाषी नजर भिडवितांना
दिव्यत्वाचा भास होतो, बाबासाहेब !
म्हणून माझे हदय ओघळले आहे
तुमच्या पावलांवर फुलांसारखे अलगद मी पाहतो तुमचा प्रदीप्त प्रज्ञांकित चेहरा तेव्हा षीलाचे सूर्यतेज मला तुमच्या डोळयात लकाकतांना दिसते. तुम्ही रोखलेले बोट मला संगिनीच्या पात्यासारखे चकाकतांना दिसते !
(डेमोफून पृश्ठ क्र.28–31)

भगवान बुध्दांनी दाखविलेल्या मार्गावरून चालत असतांना आपली दुःख वेदनांपासून सुटका व्हावी अषी अपेक्षा कवी तथागताजवळ 'या वेदनेचे तुझ्या पाऊली फूल व्हावे' या कवितेतील पुढील ओळीत व्यक्त करतो आणि म्हणतो .......

दिषांचा दाह आणि मोसमांचे नकार चुकवीत
मी उगवलो वास्तवाच्या काटेरी देठावर
पावलांना लागणा–या ठेचा चुकविण्याइतकी समज
आलेल्या वयातच कळायला लागला दुनियेच्या बदलत्या रंगाचा लपंडाव
तेव्हापासून हे आयुश्याचे रिकामे दानपात्र हातात आले.
आता मी भटकतो आहे अविरत आकांताच्या अरण्यवाटांनी ......
हाक दिलेल्या हरेकदारांनी ओतले माझ्या आयुश्याच्या दानपत्रात
अगणित व्यथांनी भरलेले हदयकलष किती जपायचे ? कसे जपायचे ?
तुडूंब भरले आहे दानपात्र या खाचखळग्यांच्या वाटा अनवाणी पावलांनी तुडवीत तुझ्या जवळ पोहचायचे आहे मला डुचमळणा–या दानपात्रासह ....
(डेमोफून पृश्ठ क्र. 32–34)

खूप दिवसानंतर मुलाला गावाची, घराची आठवन आली आहे. मुलगा गावी, घरी परतत आहे. आईषी तुटलेली नाळ गावाची माती जपते. म्हणून माणसाचे मातीषी असलेले नाते कधीच तुटत नसते, असे वक्तव्य कवी कवितेत करतो. आपणही गावची माती मुलाच्या कपाळी लावून मुलाचे स्वागत करू असे वक्तव्य बाप 'उजाड मातीचे मनोगत' या कवितेतील पुढील ओळीत करतो आणि म्हणतो......

मृग कोसळावा धरतीवर चुकार पावसात व्हावी स्वप्नांनी पेरणी आणि ऐन भरात पावसाने दयावा दगा तसे तुझ्या येण्याचे आष्वासन !
(डेमोफून पृश्ठ क्र. 43–50)

कवी केतन पिंपळापुरे यांनी झोपड पट्टीतील भकास, अंधकारमय, दरिद्री, कुपोशित, अमानवीय, असुरक्षित जीवनाचे चित्रण आपल्या कवितेत केले आहे. काळोखाच्या गोधडीत पेंगुळलेली ही झोपडपट्टी अपंग ..... अस्ताव्यस्त विस्कटलेली ...... पाटोषी चुरगाळलेल्या चेह–याची अंगठा हरवलेली चिखलात रूतून बसलेली इथली घरं भकास सकाळ उगवते ठरल्या वेळेवर हातात हात घालून वाटा बेफिकीर बसतात. बारकी पोरं रस्त्याच्या कडेला बसून राश्ट्राच्या विकासावर बिनधास्त ठप्पे मारत असतात. फाटक्या चुली पदराने नाक दाबुन जगत असतात गटारांचा वास आसमंतात मोकाट फिरतो थकलेल्या मोलकरणी सारखी सांज
(डेमोफून पृश्ठ क्र. 91–92)

**समारोप**

कवी केतन पिंपळापुरे यांनी आपल्या पिढीला समाजातील वास्तविक विदारक, दाहक, निराषाजनक परिस्थितीची जाणीव आपल्या कवितेतून करून दिली आहे. सामाजिक राजकीय आर्थिक अभावात आपल्या पिढीला जीवन जगावे लागणार आहे. पावलोपावली नकाराला सामोरे जावे लागणार आहे. वैचारिक गोंधळ माजून आहे. अषा अटीतटीच्या वेळी जो परिस्थितीवर स्वार होतो, जीवनातील वादळं झेलतो तोच आपले जीवन घडवू षकतो, असे कथन कवितेत करतो समाजात आपल्यामनासारखे घडत नसते. उगीचंच कुणी उदार होत नसते. स्नेह वाटत नसते. समाजात जे काही थोडेफार चांगले दिसते ही आतून विशाने माखलेले असते प्रस्थापितांचे सानिध्य, सावली, षब्द दाहक असतात. सरळ काळजावर आघांत करतात. आपल्या भावनांचा ते विचारच करीत नाहीत असे मत कवी कवितेत व्यक्त करतो.

प्रस्थापितांनी आपले, आपल्या भावी पिढयांचे भविश्य सुरक्षित केले आहे. प्रस्थापितांची सेवा, चाकरी करण्यातच वंचित वर्गाचे जीवन व्यतीत होणार आहे.

प्रस्थापितांपुढे सत्ता, संपत्ती, यंत्रणा लोळण घेत आहे. आपले जीवन उपेक्षित होते आहे आणि राहणार ! अषी आषंका कविता वाचता वाचता निर्माण होते. विद्रोह निर्माण करणारी परिस्थिती आणि विद्रोह मारून टाकणारी यंत्रणा यात आपण सतत भरकडत असतो. भगवान बुध्द, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपले मार्गदाते आहेत. परिस्थिती कितीही कढीण असली तरी लाचारी

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9| September 2025

पतकरू नका, भगवान बुध्द, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांनी समाजाची उभारणी करण्यासाठी, समाजाला दुःखमुक्त, षोशणमुक्त करण्यासाठी सर्वांना एकत्र यावे असे आवाहन कवी कवितेत करतो.

कवी केतन पिंपळापुरे यांच्या कवितेतील प्रत्येक ओळ स्वतंत्र अर्थाची आहे. त्यामुळे त्यांच्या कवितेतील प्रत्येक ओळीचा अर्थ विचारात घेतला तरच अर्थ आषयाचे धागेदोरे जुळतात.

कवी केतन पिंपळापुरे यांच्या कवितेला भगवान बुध्द आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तत्वज्ञानाचा आधार आहे. कवी केतन पिंपळापुरे यांची कविता लोकषाहीच्या प्रगतषील भूमिकेची समर्थक आहे. लोकषाहीला प्रतिगामीत्व बहाल करणा–यावर ती तुटून पडते. सांप्रदायिकतेवर टीका करते.

कवी केतन पिंपळापुरे यांची कविता समाजातील सर्व लहानसहान समस्यांची दखल घेते. व्यवस्थेला उघड करते. कवी केतन पिंपळापुरे यांच्या कवितेत मानवमुक्तीचा वैचारिक ध्यास आहे.

### निष्कर्ष

1. कवी केतन पिंपळापुरे यांच्या कवितेत मानवमुक्तीचा वैचारिक ध्यास आहे.
2. कवी केतन पिंपळापुरे यांची कविता विद्रोही आहे. समाजाभिमुख आहे.
3. प्रत्यक्ष जीवनानुभवाचे संदर्भ त्यांच्या कवितेत आहे. प्रत्यक्ष जीवनानुभवाचे
4. कवी केतन पिंपळापुरे यांची कविता षोशित, पीडितांचा आवाज बुलंद करणारी आहे.
5. कवी बुध्द धम्माचे अनुयायी असल्यामुळे त्यांची कविता धर्म सापेक्ष आहे.
6. कवी केतन पिंपळापुरे यांची कविता चळवळीला प्रेरक आहे.
7. कवी केतन पिंपळापुरे यांच्या कवितेने मराठी कवितेचे दालन समृध्द केले आहे.
8. मराठी कवितेची कलात्मक आणि सामाजिक बाजू कवी केतन पिंपळापुरे
9. यांच्या कवितेने अधिक बळकट केली आहे.
10. कवी केतन पिंपळापुरे यांची कविता मानवतेच्या कल्याणासाठी आहे.
11. कवी केतन पिंपळापुरे यांनी आपल्या कवितेत स्वातंत्र, समता, न्याय व बंधुत्व अंतर्भुत केलेला आहे.
12. कवी केतन पिंपळापुरे यांची कविता आंबेडकरवादी आहे.

### संदर्भग्रंथ


1. कटारे मोतीरमा ''फुले आंबेडकरी साहित्य आकलन आणि आस्वाद'' कैलास पब्लिकेषन, औरंगाबाद प्र.आ. 2006
2. डांगळे अर्जुन ''दलित विद्रोह'' ग्रंथघर प्रकाषन, मुंबई प्र.आ. 1991
3. भवरे महेंद्र ''दलित कविता आणि प्रतिमा'' लोकवाड्‌मय गृह मुंबई
4. प्र.आ. 2012
5. मनोहर यषवंत ''आंबेडकरी मराठी साहित्य'' भीमरत्न प्रकाषन, नागपूर, प्र.आ. 1991
6. ढोले संदेष ''आंबेडकरवादी कविता आकलन व अर्थमीमांसा **Notion**
7. **Press.com** यवतमाळ 2022
8. कांबळे उत्तम (संपा) ''जागतिकिकरण मराठी कविता ''परचुरे प्रकाषन मंदिर, मुंबई प्र.आ. 2009
9. पिंपळापुरे केतन सुर्यकंकण समता संगर पब्लिकेषन, नागपूर दु.आ. 2007
10. हबीर अंगार ई. मार्षल रेस वैचारिक काव्यषिल्प, मार्षल रेस केतन पिंपळापुरे
11. ओरके, संजय (डिसेंबर 2013) मानवमुक्तीसाठी आंबेडकरी कवितेची भूमिका, धम्मघोश, वर्श सातवे अंक ! नागपूर वंदना संघ
12. पिंपळापुरे केतन (2006) 'डेमोफून, मै अकेला ही चला था' समता संगर प्रकाषन, नागपूर